# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६. विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०२/०२/२०२४

# प्रेसनोट

गुरुवार, दि. ०१/०२/२०२४ रोजी दु. ३.०० वा. शिक्षण विभागामार्फत उल्हासनगर मनपा शाळांचा सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा महोत्सव २०२३-२०२४ टाउन हॉल, उल्हासनगर ३ येथे साजरा करण्यात आला. उल्हासनगर महानगरपालिकेचे एकुण शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये मान्यवरांच्या हस्ते दिप-प्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या सांस्कृतिक कार्यक्रमाची थीम **"महाराष्ट्राची लोकधारा"**निश्चित करण्यात आली होती. त्याप्रमाणे महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपणारी लोकगीते, पोवाडा, भुपाळी, भक्तीगीत, भारुड, कोळी गीत व उत्सव गीतांचा समावेश कार्यक्रमामध्ये करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांत अतिषय सुरेख सादरीकरण करुन उपस्थितांची दाद मिळवली. तसेच मनपा शाळांचे विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन विजेते ठरलेले विद्यार्थी व संघांना प्रमाणपत्र व चषक प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे शेवटी सर्व मान्यवरांचे आभार मानुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सदर कार्यक्रमास मा. श्री कुमार आयलानी, आमदार, मा. डॉ. बालाजी किणीकर, आमदार, मा. श्री. गणपत गायकवाड, आमदार, मा. श्री. अजीज शेख, प्रशासक तथा आयुक्त, मा. श्री. शरद देशमुख, मुख्य लेखा परिक्षक, मा. श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी, मा. श्री. ललीत खोब्रागडे,सहा. संचालक, मा. श्री. अशोक नाईकवाडे, उप-आयुक्त, मा. डॉ. सुभाष जाधव, उप-आयुक्त, मा. श्री. दिपक धनगर, प्रशासन अधिकारी, मा. श्रीम. निलम कदम, उप-लेखाधिकारी, श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव, मा. श्रीम. छाया डांगळे, जनसंपर्क अधिकारी, मा. श्रीम. श्रध्दा सपकाळे, सिस्टम ॲनालिस्ट, मा. श्री. परमेश्वर बुडगे, कार्यकारी अभियंता, मा. बाळासाहेब नेटके, अग्निशमन अधिकारी, मा. श्री. दिपक ढोले, उप-अभियंता, मा. श्री. सचिन वानखेडे, मुख्य सुरक्षा अधिकारी, मा. श्री. यशवंत सगळे, आपत्ति व्यवस्थापन अधिकारी, मा.श्री. राजेश घनघाव, दिव्यांग विभागप्रमुख, मा. श्री. शांताराम चौधरी, क्रिडा अधिकारी व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

2/2/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका